दिनांक 31/07/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.57

विषय - केंद्र पुरस्कृत अमृत 2.0 अभियानांतर्गत विटा नगरपरिषद हद्दीमध्ये पाणी पुरवठा योजना व सांडपाणी व्यवस्थापन योजनेकरिता सविस्तर प्रकल्प तयार करणे कामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नेमणे बाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1 ) मा. मुख्याधिकारी यांनी भांडार विभाग यांची दिनांक 26/06/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

2) नगर विकास विभाग शासन परिपत्रक क्र. स्वमअ-२०२२/ प्र.क्र.६( शिकान )/नवि ३४ दि.१४ फेब्रुवारी २०२३

3) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा ४/४७९ दि.८ एप्रिल २०२१ रोजीचे पत्र

विटा नगरपरिषद हद्दीमध्ये अमृत 2.0 अभियानांतर्गत पाणी पुरवठा योजना करणे व विटा शहरासाठी मलनिस्सारण व्यवस्था स्थापित करणे, मलनिस्सारण जोडणी देणे व मलप्रक्रिया प्रकल्प उभा करणेसाठी व सविस्तर प्रकल्प तयार करणे कामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणेचे आहे. संदर्भ क्र. २ चे पत्रा नुसार संस्थाना संपर्क साधला असता समर्थ इन्फ्राटेक सर्व्हिसेस प्रा. लि. पुणे त्यांनी काम करण्यास तयार असले बाबत कळविले आहे. विटा नगरपरिषद, विटा करीता समर्थ इन्फ्राटेक सर्व्हिसेस प्रा. लि. पुणे यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून नेमणे हरकतीचे नाही.

सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी स्वच्छ भारत अभियान २.० अभियान अंतर्गत सर्वमंजूर प्रकल्पांसाठी घनकचरा व्यवस्थापन आणि मलनिस्सारण संबंधित सर्व प्रकल्प विहित कालमर्यादेत व योग्य प्रकारे पूर्ण करणे गरजेचे आहे.

संदर्भ क्र. १ चे शासन परिपत्रकानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची तांत्रिक मान्यता घेणे गरजेचे आहे. सदर तांत्रिक मान्यता घेणेसाठीची मंजुरी शुल्काची रक्कम प्रकल्प किमती मध्ये समावेश करणेत येणार आहे.

संदर्भ क्र१ व संदर्भ क्र २ नुसार सदर प्रकल्पाची किंमत रु.१४,१८,००,०००/- आहे. या मध्ये मलनिस्सारण प्रकल्प (STP) यासाठी १०.१८ कोटी व Interception and Diversion of drains (I&D) यासाठी ४.० कोटी असे एकून किंमत रु.१४,१८,००,०००/- आहे. यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क हे प्रकल्प किमतीच्या रकमेवर २.७% म्हणजेच ३८,२८,६००/- आहे. प्रकल्प व्यवस्थापन शुल्काच्या ३% रक्कम रु.१,१४,८५८/-हि Performance Security Deposit म्हणून कार्यालयाकडे जमा करून व विहित नमुन्यातील करार पत्र करून करारनामा संस्थने प्रक्रिया पूर्ण करण्याची आहे.

पान नं 2 वर

तरी संदर्भ क्र १ व संदर्भ क्र २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे पाणी पुरवठा योजना व सांडपाणी व्यवस्थापन योजनेकरिता सविस्तर प्रकल्प तयार करणे कामी समर्थ इन्फ्राटेक सर्व्हिसेस प्रा. लि. पुणे यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून नेमणुक करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
(डॉ. विक्रम बांदल)
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा